# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 181/2024 दिनांक : 23.05.2024

## 1)घरफोडी :–

**उमरी :–** दिनांक 21.05.2024 रोजी चे 10.00 ते दि. 22.05.2024 चे 06.30 वा. चे दरम्यान, **मरियम कॉलनी नई आबादी तळेगाव ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात चोरटयांनी फिर्यादीच्या राहते घराचा कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करून घरातील भांडे 2300/–रू चे व नगदी 90,000/–रू एकुण 92,300/–रू चा माल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी बाबु बेग पि. लाल बेग, वय 70 वर्षे, व्यवसाय शेती रा. मरियम कॉलनी नई आबादी तळेगाव ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 163/2024 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2336 जाधव, मो. नं. 9421841380** हे करीत आहेत.

## 2)जनावर चोरी :–

**भोकर :–** दिनांक 22.05.2024 रोजी चे 00.30 ते दिनांक 19.05.2024 चे सकाळी 06.00 वा. चे दरम्यान, **मौ. बटाला शिवारात फिर्यादीचे घरा समोरून व साक्षीदाराचे आखाडयावरून मौ. बटाळा ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे व साक्षीदाराचे वरील वर्णनाचे चार बैल जातीचे जनावरे किंमती 1,95,000/–रूपयाचे तसेच एक दुध देणारी गाय किंमती 40,000/–रूपयाची असे एकुण पाच जनावरे किंमती 2,35,000/–रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी प्रकाश भाऊराव कापसे, वय 64 वर्षे, व्यवसाय शेती रा. बटाळा ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 151/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कराड, मो.क्रं. 9823714385** हे करीत आहेत.

## 3)मोबाईल चोरी :–

**शिवाजीनगर :–** दिनांक 22.05.2024 रोजी चे 05.00 वा. चे सुमारास, **बॉईज हॉस्टेल नवामोंढा नांदेड येथे,** यातील हॉस्टेलच्या उघडया दरवाजातुन प्रवेश करून फिर्यादी व त्यांचे मित्रांचे एकुण पाच मोबाईल किंमती 63,000/–रूपयाचा मुद्येमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी कुलभूषण माधवराव पाटील, वय 21 वर्षे, रा. बोरगाव ता. लोहा ह. मु. बॉईज हॉस्पीटल जुना मोंढा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 175/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/209 मंगनाळे, मो.क्रं. 8805013480** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :–

**शिवाजीनगर :–** दिनांक 07.06.2021 रात्री 20.00 पासुन ते दिनांक 10.03.2023 चे 17.00 वा. चे दरम्यान, **दत्तनगर नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुला मुलगी झाली तसेच कार घेण्यासाठी दहा लाख रूपये घेऊन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी घरात कोंडुन ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी 24 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 177/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1007 झांबरे ,मो.क्रं. 9923922523** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :–

**1)धर्माबाद :–**दिनांक 22.05.2024 रोजी चे 08.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरामसमोर रोडवर चिकना ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी ही त्यांच्या घरासमोर रोडवर असतांना यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाई जवळ जाऊन आम्ही तुमच्या घरासमोर कचरा टाकला नाही, तु आमच्या घरासमोर कचरा का टाकातोस तुझ्या बापाचा रोड आहे का असे म्हणुन आरोपीतांनी फिर्यादीचे केस धरून थापडबुक्याने मारहाण केली व हातातील दगडाने फिर्यादी बाईचे डाव्या हाताच्या अंगठया जवळील बोटावर मारून बोट फॅक्चर करून गंभीर दुखापत केली. फिर्यादीचे डोक्यात पाटीत दगडाने मारहाण केली व तुला खतम करतो म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी शोभाबाई शेषेराव आवरे, वय 40 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. चिकना ता. धर्माबाद जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 125/2024 कलम 326, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री आडे, मो. नं. 9552060875** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :–**दिनांक 21.05.2024 रोजी चे 10.00 वा. चे सुमारास, **सार्वजनिक रोडवर सर्वज्ञ बौध्द विहार समोर नविन वाडी नांदेड येथे,** यातील फिर्यादीने आरोपीतांना तुम्ही माझे शेतामध्ये येवुन दारूची पार्टी का करता असे म्हणाले असता यातील नमुद दोन आरोपीतांनी थापड बुक्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली व एकाने दाबुन धरून दुसऱ्याने हातातील तलवारीने उजव्या गालावर मारून दुखापत केली. या नंतर आम्हांला बोललास तर तुला खतम करतो म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सुनिल गंगाराम बुक्तरे, वय 38 वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर रा. नविन वाडी सर्वज्ञ बौध्द विहाराजवळ नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 213/2024 कलम 324, 323, 504, 506, 34 भादवि सह कलम 4/25, 27 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/156 वाघमारे, मो. नं. 7741965026** हे करीत आहेत.

## 6)प्राणी संरक्षण अधिनियम :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 21.05.2024 रोजी चे 23.30 वा. चे सुमारास, **मिठ कारखाना समोर रोडवर मिलतनगर नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या स्वताचे आर्थिक फायदया करीता 10 गोवंश जातीचे जनांवरे किंमती 1,83,000/–रूपयाचे बोलेरो पिकअप क्रमांक एमएच–26/बीई–5322 मध्ये जनावरांना निर्दयीपणे क्रुरपणे कोंबुन बोलेरो पिकअप मध्ये दाटी वाटी पायाला बांधुन वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/221, माधव गणपती माने, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 404/2024 कलम 5(अ), 5(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम सह कलम 9 प्राणी छळ प्रतिबंध अधिनियम कलम 11 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/486 तेंलगे, मो. नं. 9923480486** हे करीत आहेत.

## 7)फसवणुक :–

**उस्माननगर :–** दिनांक 10.05.2009 चे 12.00 ते दिनांक 14.02.2023 चे 17.00 वा. चे दरम्यान, **मौ. हाळदा ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व आरोपी हे नात्याने एकमेंकाचे सावत्र भाऊ आहेत. यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून 100/–रूपयाचे बॉण्डवर फिर्यादीची बनावट सही करून खोटी संमती पत्र तयार केले व फिर्यादीचे घर व प्लॉट ग्रामपंचायत हाळदा येथे नमुना नंबर 08 ला लावुन बांधकाम परवाना घेवुन फिर्यादीची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी माधव दादाराव शिंदे, वय 74 वर्षे, व्यवसाय शेती रा. हाळदा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं. 79/2024 कलम 420, 465, 467, 468, 471, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जि. जी गाडेकर, मो. क्रं. 9823148435** हे करीत आहेत.

## 8)जुगार :–

**1)शिवाजीनगर :–** दिनांक 22.05.2024 रोजी चे 19.05 वा. चे सुमारास, **श्री गणेश फॅब्रिक्स दुकानासमोर सार्वजनिक रोडवर जुना मोंढा नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या मिलन नाईट नावाचा मटका जुगार खेळत व खेळवीत असताना नगदी 1290/–रूपये व मटका जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री देविदास बापुराव बिसाडे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 143/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2081 मजाज खान, मो.नं. 9923400081** हे करीत आहेत.

**2)इतवारा :–** दिनांक 21.05.2024 रोजी चे 23.10 वा. चे सुमारास, **इतवारा बाजार हनुमान मंदीरा जवळ रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या मिलन नाईट नावाचा मटका जुगार खेळत व खेळवीत असताना नगदी 1710/–रूपये व मटका जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/664 मोहन उत्तम हाक्के, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 141/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/925 कोंडेकर, मो.नं. 9890859962** हे करीत आहेत.

## 9)आत्महत्येस प्रवृत्त केले :–

**भाग्यनगर :–**दिनांक 22.05.2024 रोजी चे 11.30 ते 11.45 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी घर क्रं 09 अंबिका नगर नांदेड येथे,** यातील नमुद ती आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे **मयत मुलगा नामे समीर सुधाकर येवतीकर, वय 42 वर्षे, रा. घर क्रं 09 अबिंकानगर नांदेड** यास व्याजाचे पैशाचे कारणावरून सतत मानसिक त्रास देवुन त्याच्यावर खोटी केस करण्याची धमकी देवुन जुलमाने व्याजाची जास्तीची रक्कम मागत असल्यामुळे त्यांचे त्रासासला कंटाळुन घरातील वरच्या मजल्यावरील रूममध्ये छताचे लोखंडी हुकाला दोरीने गळफास घेवुन आत्महत्या केला. यातील नमुद आरोपीतांनी आत्महत्या करणेस प्रवृत्त केले. वगैरे **फिर्यादी सुधाकर मुकूंदराव येवतीकर, वय 74 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त रा. घर क्रमांक 09 अंबिकानगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 214/2024 कलम 306, 385, 504, 506, 34 भादवि सह कलम 45 महाराष्ट्र सावकारी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कुकडे, मो.नं. 7719068799** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड